# लोकविज्ञान दिनदर्शिका २०२० - पर्यावरणीय महासंकट

गेली ३२ वर्षे लोकविज्ञान संघटना ‘लोकविज्ञान दिनदर्शिका’ प्रसिद्ध करते. पथदर्शी वैज्ञानिक, त्यांचे शोध याबाबत समाजात जाणीव वाढावी, घरांमधील, निरनिराळ्या सार्वजनिक जागांमधील भिंतींवर त्यांची चित्रे, माहिती असणारी दिनदर्शिका लागावी, विज्ञान आपल्या संस्कृतीचा भाग व्हावा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व्हावा अशी कल्पना.




विशेषत: शालेय गटामध्येही ‘पर्यावरणीय महासंकटा’बाबत जाणीव वाढवण्याचा प्रयत्न म्हणून ‘लोकविज्ञान दिनदर्शिका-२०२०’ साठी ‘पर्यावरणीय महासंकट, त्यावर मात करण्याचा मार्ग’ असा विषय निवडला आहे. पर्यावरण-विज्ञान, पर्यावरणाचा ऱ्हास, त्यावर मात याबाबत मोलाची भर घालणाऱ्या १२ शास्त्रज्ञांची व लोक-वैज्ञानिकांची तोंडओळख अशी १२ टिपणे या दिनदर्शिकेत आहेत. सोबत सर्वनाशी पर्यावरण ऱ्हासाच्या तीव्रतेची, हा ऱ्हास टाळण्यासाठीच्या पर्यायी-विकासनीतीच्या सर्वसाधारण सूत्रांची माहिती देणारी छोटी टिपणे आहेत. हा ऱ्हास टाळण्यासाठी उदाहरण म्हणून ग्रामीण व शहरी पाणलोटक्षेत्राचे नियोजन, पाण्याचा नियंत्रित वापर, समन्यायी पाणीवाटप, निसर्ग-संवर्धक शेती यांची तोंड-ओळख करुन देणारी टिपणेही आहेत.

**बहुरंगी छपाई, १७”x२२”; किंमत तीस रुपये. जादा प्रति घेणा-यांना सूट.**

**संपर्क- अविनाश हावळ ९८२२२६८०५८, ९४२३५८२०८७**